GR 202012151?

223

**मोजणी फी परताव्याच्या वित्तीय अधिकारात सुधारणा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१४/प्र.क्र.१२४/ल-१**
पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक : १५ डिसेंबर,२०२०

संदर्भ :-

१) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन परिपत्रक क्रमांक :-भूमापन-३४९०/६९६८/ल-१, दि. ०२.०५.१९९१.

२) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्रमांक :-भूमापन-१०८८/प्र.क्र.५९१२/ल-१, दि. १५.०६.१९९५.

३) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. भूमापन-२/प्र.क्र.३२४/२०१०/२०१८, दि. १२.११.२०१८ चे पत्र

**प्रस्तावना :-**

भूमि अभिलेख विभागाकडून महाराष्ट्र जमीन महूसल (सीमा व सीमा चिन्हे) नियम, १९६९ च्या नियम १३ अन्वये अर्जदार यांनी अर्ज केल्यानंतर त्यांच्या जमिनीच्या सीमा चिन्हांचे सीमांकन करून दिले जाते. या सेवाकरीता वेळोवेळी विहीत करण्यात आलेल्या मोजणी फी ची आकारणी केली जाते. परंतू अर्जदाराच्या वैयक्तीक अडचणीमुळे त्यास मोजणी करून घेण्याची आवश्यकता वाटत नसल्याने/मोजणी करून घेण्याचे प्रयोजन राहिलेले नसल्याने अर्जदार संबंधीत कार्यालयास तसे लेखी स्वरूपात कळवितो आणि भरलेले मोजणी शुल्क परत करण्याची मागणी करतो. अशावेळी संबंधीत प्रकरणामध्ये प्रत्यक्ष मोजणी काम केलेले नसते किंवा प्रत्यक्षात जागेवर भेट दिली नसते. त्यामुळे या प्रकरणी शासनाचा प्रत्यक्ष खर्च झालेला नसतो. अर्जदाराने जर विनंती केली तर मोजणी न करता त्यास मोजणी शुल्कापोटी शासनाकडे जमा केलेली रक्कम परत करणे क्रमप्राप्त असते. अर्जदाराने मोजणी शुल्कापोटी शासनाकडे जमा केलेली रक्कम परत करण्याबाबत संदर्भ क्रमांक २ च्या शासन निर्णयान्वये मोजणी फी परताव्याचे वित्तीय अधिकार ठरविण्यात आले होते. त्यानंतर मोजणी शुल्क परतावा करण्याच्या अधिकारामध्ये सन १९९५ पासून बदल करण्यात आलेला नाही. त्यामुळे जनतेला स्थानिक पातळीवर/जिल्हास्तरावर जिथल्या-तिथे परतावा मिळणे अशक्य होत आहे. तसेच परतावा करण्याची अनेक प्रकरणे जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे मंजूरीसाठी प्राप्त होत आहे. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयावर कामाचा अधिक ताण पडू नये व शासकीय कारभार अधिकाधिक जनताभिमूख होण्यासाठी तसेच अर्जदारास मोजणी फी परतावा परत मिळविण्यासाठी होणार त्रास कमी होवून मोजणी फी परतावा त्या-त्या जिल्ह्यातूनच मिळण्याच्या दृष्टीने मोजणी फी परताव्याच्या वित्तीय अधिकारात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

जनतेला/अर्जदाराला सहज/सुलभ मोजणी फी परतावा मिळण्याबाबतचा संदर्भ क्रमांक २ चा शासन निर्णय अधिक्रमित करून मोजणी फी परतावा करण्याचे वित्तीय अधिकाराच्या मर्यादेमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मोजणी फी भरणा करण्यात आलेल्या कार्यालयाचे नाव | दि १५.०६.१९९५.च्या शासन निर्णयान्वये मोजणी फी परताव्याचे वित्तीय अधिकार | विभागाने प्रस्तावित केलेली वित्तीय मर्यादा | वित्त विभागाने प्रस्तावित केलेली वित्तीय मर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| i | उप अधीक्षक, भूमि अभिलेख/ नगर भूमापन अधिकारी | रू.१०००/- पर्यंत | रू.२५,०००/- पर्यंत | रू.२५,०००/- पर्यंत |
| ii | जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख | रू.२०००/- पर्यंत | रू.२५,०००/- चे पुढील पूर्ण अधिकार | रू.२५,००१/- ते रू.५०,०००/-पर्यंत |
| iii | जिल्हाधिकारी तथा उप संचालक, भूमि अभिलेख | रू.५०००/- पर्यंत | --------- | रू.५०,००१/- ते रू.१,२५,०००/- पर्यंत |
| iv | जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे | संपूर्ण अधिकार | ----- | रू.१,२५,००१/- पासून पुढील पूर्णाधिकार |

२. उपरोक्त वित्तीय अधिकाराचा वापर करताना संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी परतावा मंजुर करावयाच्या प्रकरणामध्ये खालील बाबींची खात्री करावी.

i) ज्या मोजणी प्रकरणामध्ये मोजणी फी चा परतावा मंजुर करावयाचा आहे त्या प्रकरणामध्ये मोजणीसाठी भूकरमापक / परिरक्षण भूमापक / निमतानदार प्रत्यक्ष जागेवर गेलेले नसावे.

ii) अर्जदार यांनी मोजणी फी ची रक्कम कोषागारात भरणा केलेबाबत संबंधित कोषागार / उपकोषागार अधिकारी यांचेकडून चलन पडताळणी केली आहे काय ? याबाबतची खात्री करावी.

ii) दिनांक ०२.०५.१९९१ रोजीच्या शासन निर्णयानुसार मोजणी फी परतावा करताना भरणा केलेल्या रक्कमेच्या ५% किंवा प्रत्यक्ष झालेला खर्च यापैकी जे जास्त आहे ते वजा करुन उर्वरित रक्कमेचा परतावा वित्तीय अधिकारात दिलेल्या मर्यादेपर्यंत मंजुर करण्यात यावा.

iv) शासकीय जमा लेखांकन प्रणाली (GRAS) द्वारे शासन खाती जमा होणाऱ्या मोजणी फी रक्कमांचे परतावा करणेबाबत शासन वित्त विभागाकडील परिपत्रक क्रमांक संकीर्ण-१००९/प्र.क्र.३२/कोषा-प्रशा-५, दि.०१.०७.२०१६ नुसार कार्यवाही करावी.

३. जनतेच्या माहितीसाठी सदर शासन निर्णयास जिल्हास्तरावर तसेच तालुकास्तरावर व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. याबाबतची जबाबदारी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांची तसेच तालुकास्तरावर तहसिलदार यांची राहील.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४६/२०२०/विनियम, दि.१५.०१.२०२० अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२०१२१५११५३१७२६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANTOSH HARIDASRAO BHOGLE

Digitally signed by SANTOSH HARIDASRAO BHOGLE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cfe36679ae12922422bc5e7f7d277841f1fe67725f465c272fd6727259260b3d, cn=SANTOSH HARIDASRAO BHOGLE
Date: 2020.12.15 12:07:16 +05'30'

(डॉ.संतोष भोगले)
सह सचिव

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२
३. मा. मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व), मंत्रालय, मुंबई ४०००३२
४. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवान, मुंबई
५. मा. सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सविच, विधान भवन, मुंबई
६. मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खासगी सचिव, विधान भवन, मुंबई
७. उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
८. मा. विरोधी पक्षनेता (विधानपरिषद) यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
९. मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा) यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
१०. मा.मुख्य सचिव , महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई
११. अपर मुख्य सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई
१२. अपर मुख्य सचिव (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई
१३. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४. महालेखापाल ½ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
१५. महालेखापाल (वाणिज्यिक लेखा परिक्षा) मुंबई
१६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१७. निवासी लेखा परिक्षण अधिकारी, मुंबई
१८. निवड नस्ती